# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी जि. ठाणे

## माहिती व जनसंपर्क विभाग

महानगरपालिका मुख्य इमारत तळ मजला खोली क्र. ०७, काप आळी, स्व. आनंद दिघे चौक, भिवंडी ४२१३०२.

E-Mail :- pro.bncmc@gmail.com संपर्क क्र.:- ०२५२२-२५५३१४/३१५ विस्तार क्र. १०३


**प्रेस नोट क्रमांक :........** **दिनांक : ०६.०६.२०२५**

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रशासन बकरी ईद सणासाठी सज्ज.....**

येत्या ०७ जून, २०२५ ते ०९ जून, २०२५ या कालावधीत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात बकरी ईद सण साजरा होणार असुन महानगरपालिका प्रशासन यासाठी सज्ज झाले असून, आवश्यक ती तयारी पुर्ण करण्यात आली आहे. ईदगाह कत्तलखाना येथे जाणारा रस्ता तयार करण्यात आला असून, अन्य ३४ ठिकाणचे रस्ते देखील दुरूस्त करण्यात आले आहेत. तसेच, आवश्यक त्या ठिकाणी उघड्या गटारावर चेंबरदेखील बसविण्यात आले आहेत.

यावर्षी ५६ ठिकाणी कुर्बानी करण्यासाठी परवानगीचे अर्ज प्राप्त झाले असून त्यानां प्रभाग समिती स्तरावरुन परवानगी देण्यात आली आहे. तसेच, या ५६ केंद्राकरिता २०० टेम्पो, १४ जेसीबी, ११ जीप, ३ फराना इतक्या वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच कुर्बानीनंतर तेथील भागाची स्वच्छता करण्याकरिता ४० पाण्याचे टँकरचे अधिग्रहण करण्यात आले आहे. तसेच, कुर्बानीपुर्वी जनावरांची तपासणी करण्याकरिता पशुवैद्यकीय विभागाकडून ६० पशुवैद्यकीय अधिकारी शहरात दाखल झाले आहेत. कायदा व सुवस्थेच्या दृष्टीने तसेच बकरी ईद सणानिमीत्त शहरातील मौलाना, कसाई व व्यापारी संघटना यांचेसोबत बैठक होऊन त्यांनीदेखील पुर्ण सहकार्यचे आश्वासन दिले आहे.

आयुक्तांनी आरोग्य विभागाला निर्देश दिले की, जे टेम्पो जनावरांचे अपशिष्ट उचलणेकामी निश्चित केले आहेत, त्या वाहनांना क्रमांक देऊन प्रभागनिहाय वाहनांचे वाटप करावे जेणेकरुन कुर्बानीनंतर लवकरात लवकर त्या भागात स्वच्छता करता येईल. तसेच, पाणी पुरवठा विभागाने देखील तातडीने पाण्याचे टँकर पाठवून, तो भाग स्वच्छ करावा. तदनंतर आरोग्य विभागाने तेथे औषध फवारणी व पावडर फवारणी करावी. तसेच अपशिष्ट टाकण्याकरिता करण्यात येणाऱ्या खड्डयांमध्ये वेळोवेळी औषध फवारणी करण्याचे निर्देश दिलेत.

महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांना नेमून दिलेले कर्तव्य नियोजनबद्ध पार पाडावे आणि मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने शहरातील नागरिकांनीदेखील प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे. तसेच, बकरी ईद च्या कालावधीत शहरातील कचरा उचलण्याचे काम बंद राहणार असून, नागरीकांनी या कालावधीत त्यांच्या घरात जमा होणारा कचरा डब्ब्यात साठवून तो नंतर घंटागाडीमध्येच टाकावा. जेणेकरुन शहरात या तीन दिवसात कचऱ्यामुळे दुर्गंधी व रोगराई पसरणार नाही. याकरिता शहरातील नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन आयुक्तांनी केले.

**(श्रीकांत परदेशी)**
**माहिती व जनसंपर्क अधिकारी**